# इराण-इस्रायल संघर्षात संयुक्त राष्ट्राची भूमिका: एक आकलन

**डॉ. सुखदेव एस. उंदरे** सहाय्यक प्राध्यापक राज्यशास्त्र अधिविभाग शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

---

## प्रस्तावना

इराण आणि इस्रायल यांच्यातील संघर्ष हा २१ व्या शतकाच्या सुरुवातीच्या काळातील सर्वात महत्त्वपूर्ण भू-राजकीय संघर्षांपैकी एक आहे. वैचारिक वैरभाव, प्रादेशिक स्पर्धा आणि आण्विक क्षमतांवरील सामरिक स्पर्धेत दीर्घकाळापासून रुजलेला हा संघर्ष अलिकडच्या वर्षांत तीव्र झाला आहे, ज्याचा परिणाम थेट लष्करी चकमकी आणि वाढत्या प्रादेशिक अस्थिरतेमध्ये झाला आहे. ७ ऑक्टोबर २०२३ रोजी हमासने केलेल्या हल्ल्यानंतर सुरू झालेले इस्रायल-हमास युद्ध हे एक दीर्घकाळ चालणारे, बहुस्तरीय संकट बनले आहे, ज्याचे गंभीर मानवीय, वैधानिक, आर्थिक आणि भू-राजकीय परिणाम ओढवले आहेत. या पार्श्वभूमीवर, आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षा राखण्यासाठी स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रांना व्यापक युद्ध टाळण्याच्या राजकीय प्रयत्नांच्या केंद्रस्थानी आणले गेले आहे. प्रस्तुत शोधनिबंधात इराण-इस्रायल संघर्षाचे वर्तमान स्वरूप, त्यातील गुंतागुंत व या संघर्षात संयुक्त राष्ट्रांच्या भूमिकेचा शोध घेणे, तसेच या संघर्षाच्या वाटचालीवर प्रभाव टाकणाऱ्या अमेरिका व भारतासह संयुक्त राष्ट्रांच्या प्रमुख राजकीय कृती आणि राजकीय गतिशीलतेसंबंधीचे एक आकलन मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

### अरब-इस्रायल वादाचा पूर्वेतिहास

संयुक्त राष्ट्रांनी १९४७ मध्ये पॅलेस्टाइनच्या जमिनीचे विभाजन करून स्वतंत्र ज्यू आणि अरब राष्ट्रे निर्माण करण्याच्या बाजूने मतदान करुन जेरुसलेम हे आंतरराष्ट्रीय शहर असेल, असा ठराव आणला. छळ छावण्यांतून जीव वाचवण्यासाठी धावपळ करणाऱ्या ज्यूंसाठी एक हक्काची मायभूमी तयार करण्याचा या ठरावामागचा उद्देश होता. तर, पॅलेस्टिनींच्या दृष्टीने हे विभाजन त्यांच्या हक्कावरचे अतिक्रमण होते. या ठरावाला ज्यूंनी मान्यता दिली; पण अरबांनी मात्र नकार दिल्यामुळे त्याची अंमलबजावणी होऊ शकली नाही. १९४८ मध्ये ज्यू नेत्यांनी इस्रायल या देशाच्या निर्मितीची घोषणा केली. परिणामी त्याच्या दुसऱ्याच दिवशी पाच अरब देशांनी इस्रायलवर हल्ला केला. तेव्हापासून अरब-इस्रायल संघर्ष हा जगातील कायम धगधगणारा विषय बनला आहे.

१९७९ च्या इराणी क्रांतीनंतर, इराणने इस्रायलची वैधानिकता नाकारली, इस्रायल-विरोधी दहशतवादी गटांना पाठिंबा दिला आणि संपूर्ण प्रदेशात आपल्या हस्तकांमार्फत आपला प्रभाव वाढवला. त्यामुळे इस्रायलला इराणी महत्त्वाकांक्षा, विशेषतः अणुक्षमतेच्या संदर्भात त्याच्या अस्तित्वासाठी धोका वाटतो. आंतरराष्ट्रीय समुदायाला इराणच्या अणुकार्यक्रमाबद्दल तीव्र चिंता आहे. इस्रायल आणि त्याच्या मित्र राष्ट्रांना भीती वाटते की, अण्वस्त्रधारी इराण मध्य पूर्वेत अस्थिरता निर्माण करेल. इराणकडून अनेकदा हिजबुल्लाह, हमास आणि इराण-समर्थित इतर मिलिशियांसारख्या हस्तकांद्वारे इस्रायल विरुध्द युद्ध लढले गेले आहे, ज्यामुळे वेळोवेळी तणाव वाढण्यास हातभार लागला आहे. अलीकडील संकट, ज्यामध्ये इराणमधील आण्विक ठिकाणांना लक्ष्य करून इस्रायलने थेट हल्ले केले आणि त्यानंतर इराणने क्षेपणास्त्राद्वारे प्रत्युत्तर दिले, यामुळे हा संघर्ष हस्तकांमार्फतच्या संघर्षातून थेट जागतिक तणाव निर्माण करणारा ठरला आहे. या पार्श्वभूमीवर संयुक्त राष्ट्रांनी संघर्ष निवारण्यासाठी प्रयत्न सुरु केले आहेत. परंतु केवळ संयुक्त राष्ट्रांच्या प्रयत्नातून हा संघर्ष थांबेल असा दावा करता येत नाही, तर यासंदर्भात संयुक्त राष्ट्राबरोबरच अमेरिका व भारताची भूमिका देखील महत्वाची ठरणार आहे.

### इराण-इस्रायल मधील वर्तमान संघर्ष

**ऑपरेशनअल-अक्सा:** पॅलेस्टिनी कट्टरवादी आणि इराण पुरस्कृत संघटना 'हमास'ने ७ ऑक्टोबर २०२३ ला इस्रायलवर हल्ला केला. 'हमास'च्या दृष्टीने हा हल्ला म्हणजे एक मोहीम असून, तिला या संघटनेने 'ऑपरेशन अल-अक्सा' असे नाव दिले होते. 'अल-अक्सा' हे त्या पवित्र स्थानाचे नाव आहे, जे ज्यू आणि मुस्लिम या दोन्ही धर्मांच्या अनुयायांसाठी वर्षानुवर्षे चाललेल्या संघर्षाच्या मुख्य कारणांपैकी एक आहे. पॅलेस्टिनी प्राधिकरणाचे अध्यक्ष महमूद अब्बास यांनी या युद्धाच्या अभूतपूर्व स्थितीसाठी अन्य कारणांबरोबरच अल-अक्सा मशिदीसारख्या स्थानांबाबत इस्रायलने दाखवलेल्या आक्रमक वृत्तीलाही जबाबदार धरले आहे.

**पेजर्स, वॉकी-टॉकीद्वारे स्फोट:** इस्रायलने या वर्षीच्या १७ सप्टेंबरला लेबनॉनमध्ये अनेक पेजर्स आणि वॉकी-टॉकींमध्ये घडवून आणलेल्या स्फोटांमध्ये जवळपास ३९ लोकांचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते. या हल्ल्यानंतर इस्रायलने २७ सप्टेंबरला केलेल्या हल्ल्यात हिजबुल्लाहचा नेता हसन नसरल्लाचा मृत्यू झाला. अजूनही इस्रायलचे लेबनॉनवर हल्ले सुरू आहेत. हिजबुल्लाहच्या बालेकिल्ल्यावर हल्ला करण्यासाठी त्याने लेबनॉनच्या आत जमिनवरील कारवाईला सुरूवात केली. इस्रायलच्या हल्ल्यांमुळे एक हजारहून अधिक लोकांचा मृत्यू झाला आहे, तर १० लाखांहून जास्त लोकांना आपली घरे सोडावी लागली आहेत. एक लाख लोक लेबनॉन सोडून सीरियामध्ये स्थलांतरित झाल्याचे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे.

**इराणचा थेट इस्रायलवर हल्ला**: हिजबुल्लाह विरोधातील आपले मैदानी आक्रमण 'लिमिटेड, लोकलाईज्ड् आणि टार्गेटेड' असल्याचे इस्रायलने स्पष्ट केले होते. जुलैमध्ये 'हमास'चा म्होरक्या इस्माइल हानिये आणि सप्टेंबरमध्ये हिजबुल्लाहचा नेता हसन नसरल्लाह या दोन प्रमुख नेत्यांचा इस्रायलच्या हल्ल्यात मृत्यू झाला. या घटना 'हमास', इराण समर्थित हिजबुल्लाहसह इराणसाठी मोठा धक्का होत्या. त्यामुळे इराणने या हल्ल्यांचा बदला घेण्यासाठी १ ऑक्टोबर २०२५ च्या रात्री इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला केला. त्यामुळे आता इस्रायल काय करणार, या विचारानेच जगाचा श्वास रोखला गेला आहे.

**जग विनाशाच्या उंबरठ्यावर**: इस्रायलच्या लष्कराने दिलेल्या माहितीनुसार, १ ऑक्टोबरच्या रात्री इराणने इस्रायलवर जवळपास १८० क्षेपणास्त्रे डागली गेली. या हल्ल्यानंतर इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी "इराणने आजच्या रात्री फार मोठी चूक केली असून, त्याला याची भरपाई करावी लागेल, अशा शब्दांत इशारा दिला होता. त्यामुळे इस्रायल-इराण संघर्ष आता अशा वळणावर येऊन ठेपला आहे की, हे युद्ध तत्काळ थांबवले गेले नाही, तर यामध्ये अण्वस्त्र वापराचा धोका टाळता येणे कठीण होईल. आणि असे झाले तर या युद्धाची किंमत मध्यपूर्व आशियाबरोबरच साऱ्या जगाला मोजावी लागेल.

**इराण-इस्रायल: शक्तीची तौलनिक स्थिती:** इराण-इस्रायल युद्ध झालेच, तर कोणाची सरशी होऊ शकते, हे त्या देशांकडे असलेल्या शक्ती घटकांच्या तुलनेवरून समजू शकते. इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर स्ट्रॅटजिक स्टडीज (आयआयएसएस) आणि स्टॉकहोम इंटरनॅशनल पीस रिसर्च इन्स्टिट्यूट यांनी केलेल्या अभ्यासावरून विश्वासार्ह आकडेवारी समोर येते. इस्रायलची लोकसंख्या ९८ लाख, तर इराणची लोकसंख्या जवळपास ९ कोटी आहे. पण, 'जीडीपी'च्या बाबतीत इराणपेक्षा इस्रायल मोठा आहे. इस्रायलचं संरक्षण बजेट इराणपेक्षा ७ पटीने अधिक आहे. इस्रायलकडे लांब पल्ल्यावर मारा करू शकणाऱ्या एफ-१५ सह ३४० लढाऊ विमाने आहेत. शिवाय, रडारला चुकवून मारा करणारी काही एफ-३५ फायटर जेट आणि वेगवान हेलिकॉप्टर्स आहेत. इराणकडे एफ-४ एस, एफ-५ एस, एफ १४ यांसारख्या साठच्या दशकातील विमानांसह ३२० लढाऊ विमाने आहेत. त्यामुळे हवाई शक्तीच्या तुलनेत इराण इस्रायलपेक्षा थोडा कमजोर आहे. २०२२ मध्ये यूएस सेंट्रल कमांडचे जनरल केनेथ मॅकेन्झी यांनी इराणकडे ३ हजारहून जास्त बॅलेस्टिक क्षेपणास्त्रे असल्याचे सांगितले होते. इराणने क्षेपणास्त्र आणि ड्रोन प्रणाली विकसित केली आहे. पण, या शक्तीवर मात करू शकेल अशी आयर्न डोम, एरो सिस्टिम, डेव्हिड स्लिंग यांसारख्या अत्याधुनिक क्षमता इस्रायलकडे

आहेत. सैन्य शक्तीच्या बाबतीत मात्र इराण इस्रायलपेक्षा वरचढ आहे. इराणकडे सुमारे ६ लाख, तर इस्रायलकडे १ लाख ७० हजार सैनिक आहेत.

**इराण व इस्रायला असणारा पाठींबा** : कोणत्याही देशाला आज स्वबळावर युद्ध करणे अशक्य आहे. याला इराण-इस्रायल युद्धही अपवाद नाही. इराणला त्याचे 'ॲक्सिस ऑफ रेझिस्टन्स' म्हणजे शेजारच्या देशांतील संघटनांचा, म्हणजे हमास, लेबनॉनमध्ये हिजबुल्लाह, येमेनमध्ये हुती, बहारीनमध्ये अल-अस्तर ब्रिगेड या सशस्त्र गटांचा पाठिंबा आहे. दुसरीकडे, इस्रायलच्या मागे अमेरिका, जॉर्डन, सौदी अरेबिया, कतार, युएई, ओमान हे देश आहेत. या पाठबळामुळे इस्रायलने मध्यपूर्वेलाच आव्हान दिले आहे.

**इराण-इस्रायल संघर्ष व अमेरिकेची भूमिका:**

१९७९ च्या इस्लामिक क्रांतीनंतर अमेरिकेच्या धोरणानुसार चालण्यास इराणने नकार दिला. तेव्हापासून अमेरिका इराण हा मध्यपूर्वेतील हितसंबंधांसाठी मोठा धोका असल्याचे मानते. आता इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्र हल्ला केल्यावर ही स्थिती अधिकच भीषण झाली आहे. अरब-इस्रायल युद्धात कोणत्याही एका पक्षाने माघार घेणे तर दूरच, उलट इराणच्या हल्ल्यापासून इस्रायलचे संरक्षण करण्याचे आदेशच अमेरिकेचे अध्यक्ष बायडन यांनी आपल्या लष्कराला दिले आहेत. इराणमध्ये अशी एकही जागा नाही, जिथे आमची शस्त्रे पोहोचू शकत नाहीत, असा इशारा नेतन्याहूंनी नुकताच संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेत दिला. त्यांच्या या वक्तव्याचा रोख मध्यपूर्वेतील अमेरिकी लष्करी तळांकडेही आहे, हे स्पष्ट आहे.

७ ऑक्टोबर, २०२५ रोजी इस्रायल आणि हमास यांच्यामध्ये सुरू झालेल्या युद्धाला दोन वर्ष पूर्ण होऊन गेली आहेत. दरम्यानच्या काळात या युद्धाची व्याप्ती इस्रायल विरुद्ध हमास एवढीच न राहता ती हिजबुल्लाह आणि इराणपर्यंत वाढत गेली. सध्या तर लेबेनॉन, येमेन आणि इराण या तीन आघाड्यांवर इस्रायल लढत आहे. इराणने मध्यपूर्वेत पोसलेल्या सशस्त्र संघटना इस्रायलला वाकुल्या दाखवतात आणि इस्रायल अरबांवर आपली शस्त्रे उगारतो. इस्रायलच्या या अतिमहत्त्वाकांक्षी आणि युद्धखोर कारवायांमागे अमेरिका आहेच. कारण आपला महासत्तेचा आब कायम राखण्यासाठी अमेरिका सातत्याने प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे युद्धात सक्रिय राहते. 'जस्टिफियेबल इंटरव्हेन्शन' अर्थात 'न्याय्य हस्तक्षेप' हे अमेरिकी नेतृत्वाचे आवडते धोरण बनले आहे. जगात दहशतवाद असेल, तर तो दहशतीनेच संपवायचा हे जनुकाही अमेरिकी परराष्ट्र धोरणाचे मुख्य सूत्र बनले आहे. त्यामुळेच जग पुन्हा महायुद्ध आणि महाविनाशाच्या खाईत ढकलले जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

**इराण-इस्रायल संघर्ष व भारताची भूमिका**

इस्रायल विरुद्ध हमास + हिजबुल्लाह + इराण यांच्यातील युद्धाकडे भारताने आपल्या सैद्धांतिक चौकटीतून बघितले पाहिजे. भारताची इस्रायल-पॅलेस्टाइन मुद्द्याबाबत भूमिका महत्त्वाची आणि स्पष्ट आहे. त्यानुसार दोन्ही देशांसोबत संतुलित संबंध ठेवण्याचा भारताने आजवर प्रयत्न केला. सध्याचे युद्ध आणि घडणारा हिंसाचार तत्काळ थांबवण्याचे आणि दोन्ही बाजूंना चर्चेत सहभागी होण्याचे आवाहन भारताने केले आहे. युद्धामुळे होणारे मृत्यू, अन्नधान्याची टंचाई, भडकलेली महागाई, विस्थापितांचे जीवन आणि धोक्यात आलेले शारीरिक-मानसिक आरोग्य अशा गंभीर समस्यांच्या विळख्यात मध्यपूर्वेतील देश अडकले आहेत. त्यातच इस्रायल-इराणमध्ये युद्ध सुरू झाले, तर ते जागतिक समुदायाचे फार मोठे अपयश असेल. अमेरिकेला मात्र आपला महासत्तेचा तोरा कायम राखायचा आहे आणि त्यासाठी दहशतीला दहशतीनेच संपवायचे आहे. या स्थितीत भारतासारख्या उगवत्या शक्तीने आपल्या दीर्घकालीन हिताचा विचार करुन, हे युद्ध थांबवण्यासाठी आपल्या राजनयिक कौशल्यांचा उपयोग जागतिक शांतता आणि मानव समुदायाच्या हितासाठी होण्याकरिता भारताने ठोस भूमिका घेणे आवश्यक आहे.

**इराण-इस्रायल संघर्ष व संयुक्त राष्ट्राची भूमिका**

**सुरक्षा परिषदेची आपत्कालीन सत्रे आणि युद्धविराम व तणाव कमी करण्याचे आवाहन**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेने इराण-इस्रायलमधील वाढत्या तणावावर चर्चा करण्यासाठी आपत्कालीन सत्रे बोलावली आहेत. जून २०२५ मध्ये, इराणी आण्विक आणि लष्करी सुविधांवर इस्रायलने केलेल्या हल्ल्यानंतर आणि त्यानंतर इराणच्या क्षेपणास्त्र प्रत्युत्तरांनंतर बिघडलेल्या परिस्थितीवर चर्चा करण्यासाठी एक आपत्कालीन बैठक आयोजित करण्यात आली होती. या सत्रादरम्यान, महासचिव अँटोनियो गुटेरेस यांनी इशारा दिला की हे संकट "अशी आग पेटवू शकते ज्यावर कोणाचेही नियंत्रण राहणार नाही," त्यांनी यावर जोर दिला की, तणावातील ही वाढ जागतिक स्थिरतेला धोका निर्माण करणारी आहे. अशावेळी त्यांनी आंतरराष्ट्रीय कायद्यावर आधारित मुत्सद्देगिरीचे महत्त्व अधोरेखित करून संयुक्त राष्ट्र सनद आणि अण्वस्त्र प्रसारबंदीच्या नियमांचे पालन करण्यावर भर दिला. संयुक्त राष्ट्राची ही सत्रे वाद मांडण्यासाठी, परस्परविरोधी भूमिका आंतरराष्ट्रीय समुदायासमोर आणण्यासाठी आणि संबंधित पक्षांना शांततापूर्ण निराकरणाकडे नेण्याचा प्रयत्न करण्यासाठी एक जागतिक मंच उपलब्ध करून देतात.

संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांनी सातत्याने युद्धविरामासाठी आणि तातडीने तणाव कमी करण्यासाठी आवाहन केले आहे. १८ जून २०२५ रोजी, त्यांनी संघर्ष तत्काळ थांबवण्याचे सार्वजनिक आवाहन केले, नागरी जीवनाच्या होणाऱ्या हानीचा निषेध केला आणि शांततेसाठी एक चौकट म्हणून संयुक्त राष्ट्रांच्या सनदेच्या भूमिकेवर भर दिला. अशा आवाहनांचे व्यापक परिणाम होतात. ते कायद्याचे आणि नैतिक नियमांचे पालन करण्याच्या आंतरराष्ट्रीय अपेक्षांना समोर आणतात आणि मानवतावादी परिणामांबद्दल आंतरराष्ट्रीय चिंतेचे प्रकटीकरण करतात. ही आवाहने शांतता करारांसाठी प्रयत्न करणाऱ्या सदस्य राष्ट्रांना राजकीय संरक्षण देखील देतात आणि संघर्ष प्रतिबंधावरील जागतिक चर्चेला आकार देतात.

**संयुक्त राष्ट्रांचे अपयश**

संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरेस यांनी मध्यपूर्वेतील युद्धामागे 'टीट फॉर टॅट' अशा स्वरुपाच्या हिंसाचाराचे घातक चक्र असल्याचे म्हटले आहे. तर, इस्रायलचे प्रधानमंत्री बेंजामिन नेतन्याहू यांनी गुटेरस यांच्यावर भेदभावपूर्ण वर्तनाचा आरोप करून त्यांना इस्रायलमध्ये येण्यावर बंदी घातली आहे. या स्थितीत केवळ आवाहन करण्यापलीकडे संयुक्त राष्ट्रे स्वत:हून कोणताही ठोस पाऊले उचलू शकत नाही, हे संयुक्त राष्ट्रांचे मोठे अपयश म्हणावे लागेल.

महासभा आणि आंतरराष्ट्रीय कायदा: सुरक्षा परिषद थेट शांततेला असलेल्या धोक्यांवर लक्ष देत असताना, महासभा महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर व्यापक आंतरराष्ट्रीय सहमती व्यक्त करून पूरक भूमिका बजावते. ऐतिहासिकदृष्ट्या, महासभेने मध्यपूर्वेतील संघर्षांचे शांततापूर्ण निराकरण आणि प्रादेशिक अखंडतेचा आदर करण्याचे आवाहन करणारे ठराव मंजूर केले आहेत—ही तत्त्वे इराण-इस्रायल संघर्षाला लागू होतात.

**सुरक्षा परिषदेचे राजकारण**

स्थायी सदस्यांचा नकाराधिकार अनेकदा सामुहिक कृतीमध्ये अडथळा आणतो. अमेरिका, रशिया, चीन आणि युरोपीय सत्तांमधील भिन्न धोरणात्मक हितसंबंध परिषदेच्या कार्यप्रणालीवर परिणाम करतात, ज्यामुळे बंधनकारक ठराव किंवा निर्बंधांच्या निर्णयांची परिणामकारकता मर्यादित होते. निर्बंध, निषेध आणि राजकीय दबावाच्या मांडणीवरील मतभेद हे दर्शवतात की भू-राजकीय स्पर्धा संयुक्त राष्ट्रांचा सामूहिक प्रभाव कसा कमी करतात. अनुपालन आणि अंमलबजावणी संयम आणि कायदेशीर पालनाचे संयुक्त राष्ट्रांचे आवाहन हे प्रामुख्याने सार्वभौम राष्ट्रांच्या स्वेच्छेने अनुपालनावर अवलंबून असते.

**निष्कर्षत:**

इराण-इस्त्रायल संघर्षात संयुक्त राष्ट्राची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. राष्ट्रा-राष्ट्रातील संघर्षात संयुक्त राष्ट्रे राजकीय मंच, कायदेशीर नियामक संस्था आणि मानवतावादी समन्वयक म्हणून कार्य करतात. आंतराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रे जी कार्ये करतात त्यामध्ये प्रामुख्याने सुरक्षा परिषदेची आपत्कालीन सत्रे, युद्धविरामासाठी आवाहन, आंतरराष्ट्रीय कायद्याचे पालन आणि मानवतावादी संरक्षणासाठी पुरस्कार यांचा समावेश आहे. परंतु या प्रयत्नांनंतरही, संघर्ष सोडवण्याची किंवा तो कमी करण्याची संयुक्त राष्ट्रांची क्षमता तिच्या स्वतःच्याच संस्थांमधील भू-राजकीय विभागणी, शक्तिशाली राष्ट्रांचे सामरिक हितसंबंध आणि इराण-इस्त्रायल संबंधांचे मूळतः शत्रुत्वपूर्ण स्वरूप यामुळे मर्यादित राहते. संयुक्त राष्ट्रांना आपली परिणामकारकता वाढवण्यासाठी, सामूहिक कृती यंत्रणा वाढविणे, आंतरराष्ट्रीय नियमांची अंमलबजावणी आणि राजकीय प्रभाव मजबूत करणाऱ्या सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे.

**संदर्भ:**

संयुक्त राष्ट्रे. (२०२५, १३ जून). इराण-इस्त्रायल संघर्षादरम्यान, हल्ले आणि प्रतिहल्ले होत असताना, सुरक्षा परिषदेची तातडीची बैठक. संयुक्त राष्ट्रे कार्यालय, जिनिव्हा. येथून प्राप्त: https://www.ungeneva.org.

संयुक्त राष्ट्रे. (२०२५, २१ जून). इराण-इस्त्रायल संघर्ष आणि गाझा संकटाच्या वाढत्या गंभीरतेच्या पार्श्वभूमीवर, संयुक्त राष्ट्रांनी तातडीने तणाव कमी करण्याचे आवाहन पुन्हा केले. संयुक्त राष्ट्रे कार्यालय, जिनिव्हा. येथून प्राप्त: https://www.ungeneva.org.

संयुक्त राष्ट्रे. (२०२५, १८ जून). संयुक्त राष्ट्रांच्या सरचिटणीसांनी इस्त्रायल आणि इराण यांच्यात युद्धविरामाच्या आवाहनाचा पुनरुच्चार केला. येथून प्राप्त: https://india.un.org/en/297236-un-secretary-general-reiterates-call-ceasefire-between-israel-iran.

संयुक्त राष्ट्रे. (२०२५). महासभा ठराव ४३/१७६ (पॅलेस्टाईनचा प्रश्न).

द रॉयटर्स. (२०२६, जानेवारी-फेब्रुवारी). इराण-इस्त्रायल तणाव आणि वाटाघाटींवरील विविध लेख.